# महाबळ – अभ्यंकर घराणे

## वाई – पुणे – झांशी – नागपूर – विदिशा – रतलाम – उज्जैन – बिलासपूर

या घराण्याचे पूर्वीचे आडनांव महाबळ होते. ते अंगाने धडधाकट, उंचपुरे, पेहेलवानासारखे आणि प्रभावशाली व्यक्तिमत्वाचे होते. परंतु स्वभावाने नम्र, विनयशील वृत्तीचे असल्याने लोकांची त्यांच्याबद्दल वाटणारी भीती गेली व त्यांना अभ्यंकर असे संबोधू लागले. शेवटचे बाजीराव पेशवे यांचेकडे या घराण्यातील पुरुष कारकुनी करत. रिकामपणी त्यांना कापडाचे हत्ती करण्याचा छंद होता. ही कला पाहून पेशवे प्रसन्न झाले व त्यांनी त्यांना सदाशिवपेठेत एक वाडा बक्षिस दिला. कालांतराने ते व त्यांचे पुत्र नोकरी निमित्त उत्तरप्रदेशांत झांशीस गेले व तेथे त्यांनी रेल्वे खात्यात नोकरी केली. त्यामुळे पुण्याचा संबंध तुटला. पुढे श्री. गोपाळ गणेश अभ्यंकर हे बबिना स्टेशनचे स्टेशनमास्तर असताना कुणी वयस्क स्त्री पुण्याहून आली व "पुण्याच्या सदाशिवपेठेतील घराचा हिस्सा नको" असे त्यांच्याकडून लिहून मागितले. ते स्वभावतःच निरिच्छ व विरक्त वृत्तीचे असल्यामुळे त्यांनी तसे त्यावेळी लिहून दिले. त्यामुळे या घराण्याची मालमत्ता पुणे येथे शिल्लक राहिली नाही.

१/१ **विष्णु**–हा या घराण्याचा मूळ पुरुष. इ. स. १८५७ च्या आधी विष्णुपंत अभ्यंकर घराणे वाईस रहात होते. त्यांना चार पुत्र होते. १) चिंतामणी २) बाळकृष्ण ३) सखाराम ४) गणपती. यांच्या पैकी गणपती ब्रह्मावर्त येथे गंगा मंदिरात पूजा अर्चा करून संन्यासी राहिले.

२/२ **गणपती विष्णु**–कानपूर जवळ २० मैलावर बिठूर म्हणजेच ब्रह्मावर्त हे ऐतिहासिक (पौराणिक) ठिकाण आहे. तिथे मराठयांचा शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव ३३ वर्षे राहून इ. स. १८५१ मध्ये मृत्यू पावला. त्या ठिकाणच्या गंगामंदिरांत गणपती विष्णु हे पूजा-अर्चा करून संन्यासी म्हणून राहिले. याशिवाय इतर विशेष माहिती नाही.

३/२ **सखाराम विष्णु**–यांना दोन पुत्र. गणेश आणि नारायण.

४/३ **गणेश सखाराम**– #

५/४ **गोपाळ गणेश**–जन्म १८७४ अकोट येथे. मृत्यू ६ ।२ ।१९५४ उज्जैन येथे.

भार्या : १) तीन वर्षांनी निवर्तली. माहेर–गोरे. काशी येथील. हिच्यापासून १ पुत्र सखाराम.

२) **आंनदीबाई**–जन्म १८९१. मृत्यू १९६३. माहेर–यमुना गणेश जोशी. रा. गोयत्री.कन्या : ५ पुत्र–४. कन्या :

१) **वेणूताई**–सासर–श्री. गोरे. काशी, (उ. प्र.) वयाच्या ९ व्या वर्षी विवाह झाला. परंतु २-३ वर्षांनी निधन.

२) **गंगुताई**–जन्म १९०७. सासर–लक्ष्मीबाई मुकुंद सोमण. रा. इंदूर. अपत्य नाही. सध्या वास्तव्य–द्वारा सौ. शैला सोमण, उज्जैन. सध्या वय ८२. (निवृत्त पोस्ट निरीक्षक देवास.)

३) **कमलताई**–सासर–कमल नारायण चितळे. जबलपूर, शिक्षण–मॅट्रिक. वय–६८ वर्षे.

४) **शंकुतला**–१२ व्या वर्षी निधन.


५) **येसूताई**–सासर–येसूबाई लक्ष्मण लोंढे. पोस्टमास्तर बेटमा (म. प्रदेश). अपत्य नाही. मृत्यू १९७२.

६/५ **सखाराम गोपाळ**–गोपाळ गणेशच्या पहिल्या पत्नीचा हा एकुलता एक पुत्र ! जन्म विजयादशमी इ.स. १९०० ग्वाल्हेर येथे. वयाच्या २ऱ्या वर्षी आईचा मृत्यू. त्यामुळे सावत्र आईने सांभाळ केला.

शिक्षण–यवतमाळचे श्री. रामभाऊ दामले, वकील, नंतर पुण्यास लोकमान्य टिळकांचे व्याही श्री. साने यांचेकडे आणि झांशीचे मोसे सुवा साहेब किल्लेदार यांचे कडे झाले. उर्दू, इंग्रजी, मराठी, हिंदी या भाषांवर प्रभुत्व होते. इ.स. १९२१ साली रेल्वेतील नोकरी सोडून स्वातंत्र्य संग्रामांत उडी घेतली. खादी व स्वदेशीचा प्रचार, गीता मंडळाची स्थापना, शरीर संवर्धन, स्थळांचे विमोचन, राष्ट्रवीरांचे स्मृतिगीत आणि जनजागृती इ. कार्ये केली. पेंटिंगचे काम करून आपला उदरनिर्वाह चालविला. इ.स. १९२३ साली नागपूर येथे झांशीचे प्रतिनिधीत्व करून झेंडा सत्याग्रहांत भाग घेतला. त्यामुळे ६ महिने अमरावतीत कारावासाची शिक्षा झाली. स्वातंत्र्यवीर

## महाबळ-अभ्यंकर घराणे

### वाई – पुणे – झांशी – नागपूर – विदिशा – रतलाम – उज्जैन – बिलासपूर



बिहारी यांच्या अंत्येष्ठीत बाबू राजेंद्रप्रसाद यांची मदत मिळाली. इ.स. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहांत त्यांनी भाग घेतला होता. झांशी, लखनौ कारागृहांत ६ महिने शिक्षा झाली होती. श्री.रघुनाथ धुलेकर व श्री. चंद्रभान गुप्ता यांच्याबरोबर १९४१ मध्ये झांशी, आग्रा येथे जेलमध्ये होते. 'भारत छोडो' आंदोलनांत रु. २०० दंड व ४ महिने तुरूंगवासाची शिक्षा झाली होती. चिरगांव येथील गणेश शंकर विद्यार्थी-स्मारक पुस्तकालयाचे शास्त्रशुध्द व्यवस्थापन त्यांनी केले होते. इ.स. १९४० मध्ये झांशी येथे आयुर्वेद विश्वविद्यालयांत सक्रिय भाग घेतला होता. स्वातंत्र्यानंतर कानपूर येथे अध्यात्म केंद्राची स्थापना केली. १९६८ मध्ये रामनाम पवित्र ग्रंथाची बंगविद्यालय कानपूर येथे प्राणप्रतिष्ठा केली. त्यांच्या एकूण देशसेवेबद्दल स्वातंत्र्य सेनानी म्हणून पेन्शन व ताम्रपट मिळाला. मृत्यू जून १९८२ कानपूर येथे झाला.

भार्या : **जानकीबाई**–माहेर–ग्वाल्हेर येथील भागवत.

कन्या–३ पुत्र–५.

कन्या :

१) **शंकुतला**–सासर–पति–रामचंद्र कृष्णराव ताम्हनकर. सेवानिवृत्त रेल्वे ड्रायव्हर, झांशी, मध्य रेल्वे.

२) **कुमुद**–सासर–जोशी. पति–गोविंद भास्कर जोशी. ग्वाल्हेर (म.प्र.)

३) **रेखा**–सासर–थत्ते. पति–अनंत केशव थत्ते. इंदूर मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह.

७/५ **विनायक गोपाळ**–जन्म २ ।९ ।१९०९ झांशी येथे. शिक्षण–एम्.ए. इतिहास, इंग्लिश, एल्.एल्.एम्., टी.डी. कोविद, आयुर्वेदाचार्य. नोकरी–शिक्षण खाते, ग्वाल्हेर, उज्जैन, सुरनेर, झोकर या ठिकाणी शिक्षक नंतर मुख्याध्यापक आणि निरीक्षक, म्हणून काही वर्षे काम. इ.स. १९६४ मध्ये सेवानिवृत्त. देवास गेट, मिडल स्कूल चे मुख्य प्राध्यापक म्हणून प्रसिध्द. मृत्यू अल्सरने १७ ।११ ।१९७६ रोजी उज्जैन येथे झाला.

भार्या : **प्रभावती**–माहेर–शांता गणेश देवधर, चांदूर. यांना १ पुत्र, ६ कन्या.

कन्या :

१) **सुधा**–जन्म ११ ।४ ।१९३६. मॅट्रिक सासर–शीला मधुकर जोशी. जबलपूर.

२) **आशा**–जन्म १८ ।१२ ।१९३८. शिक्षण–बी.ए., बी.एड्. सासर–शुभदा मधुकर मोघे. परतवाडा.

३) **मीना**–१४ ।१ ।१९४३ शिक्षण–एम्.ए.बी,एड. सासर–भारती विजय व्यवहारे. औरंगाबाद.

४) **सरोज**–जन्म २४ ।२ ।१९४९. शिक्षण–एम्.एस्सी. सासर–अस्मिता अरुण जोशी. मुंबई.

५) **मंगला**–जन्म २६ ।६ ।१९५१. शिक्षण–एम्.बी.बी.एस्. सासर–स्मिता शंकर खोचे. नवी दिल्ली.

६) **कल्पना**–जन्म १३ ।८ ।१९५७. शिक्षण–बी.ए. सासर–रमा सुरेश मुंजे. जबलपूर

८/६ **वसंत विनायक**–जन्म गुढीपाडवा सन १९४२. शिक्षण–मॅट्रिक. अविवाहित. मृत्यू जून १९५९.

९/५ **नारायण गोपाळ**–जन्म १९ ।१० ।१९११. शिक्षण–मॅट्रिक. वास्तव्य–१३ ।२ शितल व्यास यांचे घर, झालानी कॉलनीच्या मागे, मित्र–निवास रोड, रतलाम, व्यवसाय–पोस्ट खात्यात नोकरी, सब्–पोस्टमास्तर म्हणून निवृत्त. ४ ।५ ।१९३३ ते २२ ।१२ ।१९६७ पर्यंत नोकरी केली. होमिओपाथीचा कोर्स पूर्ण केला आहे.

भार्या : **उषा**–माहेर–बेटुबाई त्र्यंबक गद्रे. टिमारणी.

कन्या :

१) **बकुळ**–जन्म ६ ।४ ।१९४९. शिक्षण–बी.ए. सासर–राजश्री रवींद्र भिडे. वास्तव्य–'प्रपंच'. क्रीगंज उज्जैन, (म.प्र.).

२) **अरुणा**–जन्म ९ ।५ ।१९५१. शिक्षण–बी.ए. सासर–अरुणा अनिल पेंडसे. जबलपूर. (म. प्रदेश)

१०/६ **श्रीराम नारायण**–जन्म २० ।१० ।१९४६. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–रतलाम येथे मध्यप्रदेश इलेक्ट्रिसिटी बोर्ड मध्ये कॅशिअर.

भार्या : **शुभांगी**–माहेर–शांता दांडेकर. रा. शुजालपूर (म.प्र.)

पुत्र–**दिपक**–जन्म १३ ।१२ ।१९७५. इ. ७ वीत शिकत आहे.


कन्या : **वर्षा**–जन्म ६ ।८ ।१९७८. शिकत आहे.

११/६ **सिध्दनाथ श्रीराम**–जन्म ४ ।३ ।१९५८ उज्जैन येथे. शिक्षण–बी.ई.मेकॅनीकल् इंजि. व्यवसाय–माझगांव डॉक, मुंबई येथे नोकरी.

भार्या : उमा–शिक्षण–बी.ए.
पुत्र–**आंनद**–जन्म ७ ।३ ।१९८५.
१२/५ **शिवराम (बाळासाहेब) गोपाळ** –जन्म २५ ।१ ।१९२४ माळीपुरा, उज्जैन येथे. शिक्षण– बी.ए. माधव कॉलेज, उज्जैन व को-ऑपरेटिव्ह बिझनेस मॅनेजमेन्ट कोर्स. जी.आय.पी. रेल्वेत २५ ।५ ।१९४४ ते १८ ।८ ।१९५७ पर्यंत तार मास्तर, स्टेशन मास्तर, या पदांवर नोकरी. १९ ।८ ।१९५७ ते २० ।१० ।१९७९ पर्यंत कल्याण–निरीक्षक, मध्य रेल्वे. नंतर स्वेच्छेने सेवानिवृत्त. पार्वती प्रौढ शिक्षण वर्ग, नागरिक मंडळ,नागपूर, दीनदयाळ शोध संस्थान, नागपूर. ऑल इंडिया रिटायर्ड रेल्वे मेन्स असोसिएशन, नागपूर, समर्थ सेवा मंडळ इ. मध्ये सक्रिय सहभाग.
भार्या : **सुशिला**–माहेर–इंदू शंकरराव देवधर. शिक्षण–लग्नापूर्वी ५ वी पर्यंत, लग्नानंतर इंटर पास. नंतर नोकरी करून बी.ए. पर्यंत. राहणार–चंदेना, जिल्हा–सागर (म.प्र.)
कन्या : **लता**–जन्म १२ ।११ ।१९५०. शिक्षण–एम्.एस्सी. फर्स्ट क्लास. विवाह–१९६३ मध्ये. पति–डॉ. प्रभाकर गोविंद एकबोटे. रेल्वे क्वार्टर नं. डी/८ भुसावळ.
१३/५ **विष्णु गोपाळ**–लहानपणीच मृत
१४/४ **वासुदेव गणेश**–मृत्यू २० ।७ ।१९३१ रोजी कॉलऱ्याने रेल्वेत नोकरी असताना सतना येथे झाला. त्यानंतर मुलांचा सांभाळ आतेभाऊ श्री. रामभाऊ दामले (वकील) भारतीय संस्कृती भवन, टिळकवाडी, यवतमाळ यांचे घरी झाला.
भार्या : **लक्ष्मीबाई**–माहेर–आगाशे. रा. पुणे. कन्या ३ पुत्र ५.
कन्या :
१) **दुर्गा**–सासर–उमाबाई. पति–गोपाळ दत्तात्रय चिपळूणकर. अकोला.
२) **शांता**–सासर सुशिला. पति–वसंत धोंडोपंत पाटणकर. नांदेड.
३) **शंकुतला**–सासर–शालिनी. पति–विश्वनाथ महादेव काळे. जळगांव.
१५/५ **विश्वनाथ वासुदेव**–जन्म ९ ।७ ।१९१७. शिक्षण–इंग्रजी ४ थी पर्यंत. वास्तव्य–पाटील चाळ, लालबाग, बऱ्हाणपूर, पिन–४५०३२१. व्यवसाय–मध्य रेल्वेत बऱ्हाणपूर येथे २१ ।१२ ।१९४५ ते ३१ ।७ ।१९७५ पर्यंत नंबर मार्कर म्हणून नोकरी.
भार्या : **मालती**–माहेर–शांता. सांगली.
कन्या : **सरोज**–जन्म २४ ।८ ।१९६४. शिक्षण–मॅट्रिक. अविवाहित.
१६/६ **उदय विश्वनाथ**–जन्म ३० ।१२ ।१९५८. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय– रेल्वेत नोकरी,अकोला.
१७/६ **संजय विश्वनाथ**–जन्म १८ ।३ ।१९६२. शिक्षण–मॅट्रिक.
१८/५ **पुरुषोत्तम वासुदेव**–जन्म २० ।८ ।१९२०. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय–प्रथम उज्जैन व अकोला येथे मिलमध्ये काही वर्षे नोकरी. नंतर किराणामालाचा स्वतंत्र व्यवसाय व दूध डेअरी. वास्तव्य–रामदास पेठ, अकोला.
भार्या : **रजनी**–माहेर–रजनी पुरुषोत्तम गोखले. रा. उज्जैन. पुत्र ३.
१९/६ **दत्तात्रय पुरुषोत्तम**–जन्म १९४८. शिक्षण–मॅट्रिक. व्यवसाय– सेल्स टॅक्स खात्यामध्ये अकोला येथे नोकरी. वास्तव्य–रामदास पेठ अकोला.
भार्या : **सुषमा**–माहेर–सुषमा दत्तात्रय काटे. अकोला. पुत्र-२.
१) **अतुल**–वय १२ वर्षे शिकत आहे. २) **तुषार**–वय १० वर्षे शिकत आहे.
२०/६ **घन:श्याम पुरुषोत्तम**–जन्म १९४९. व्यवसाय–डेअरीचा व्यवसाय अकोला येथे आहे.
भार्या : **सीमा**–माहेर –सीमा प्रभाकर धारप. डोंबिवली, जि. ठाणे. पुत्र–**भूषण**–वय ७ वर्षे.
कन्या : **धनश्री**–वय ५ वर्षे.
२१/६ **अरुण पुरुषोत्तम**–जन्म १९५१. व्यवसाय–सिंप्लेक्स मिल फॅक्टरीत नोकरी, अकोला.
भार्या : **अलका**–माहेर–अलका यशवंत चाफेकर, पुणे. पुत्र–१) **मनिष**–वय ५ वर्षे. २) **मयूर**–वय ४ वर्षे.
२२/५ **मधुकर वासुदेव**–खाजगी दुकानांत नोकरी, अकोला.
२३/५ **कृष्णा वासुदेव**–व्यवसाय –नोकरी. मध्य रेल्वेतून अकौंटंट म्हणून निवृत्त. वास्तव्य– डी१/१३ कपिला, बासव–कल्याण नगर, शिवमंदिर रोड,

अंबरनाथ.
२४/६ **सुनिल कृष्ण-** #
२५/६ **अनिल कृष्ण-** #
२६/५ **वामन वासुदेव**–जन्म २४ ।१ ।१९२२ माणिकपूर येथे. शिक्षण–मॅट्रिक व टेक्निकल रेडिओ व टि.व्ही. चा कोर्स. व्यवसाय–रेडिओ कोचिंग क्लास चालवितात. वास्तव्य–जोगेश्वरी १०५५ ।१ ।ब अंकाली पोलीस स्टेशन जवळ, गांवभाग, सांगली.
**भार्या : विजया**–माहेर–विजया सखाराम गद्रे, नागपूर.
पुत्र–२
२७/६ **श्रीकांत वामन**–जन्म १९५३.
भार्या : **उज्ज्वला**–
पुत्र–**मंदार**–वय ६ वर्षे.
कन्या : **सोनाली**–वय १ वर्ष.
**२८/६ शिरीष वामन**–जन्म १९५८.
**भार्या : शुभदा**–पुत्र १ ओंकार–वय १ वर्ष
२९/३ **नारायण सखाराम**– जन्मशिक्षण इ. माहिती नाही. व्यवसाय–रेल्वेत नोकरी १८५७ मध्ये ठाणे–मुंब्रा लाईनवर कामास होते. पुत्र १.
३०/४ **दत्तात्रय नारायण**–शिक्षण–पुणे येथे इ. स. १९१४मध्ये मिलिटरीत नोकरी. इ. स. १९१८ मध्ये युद्धातून परत आल्यावर रेल्वेत आर.ए.एस.एम., म्हणून नियुक्ती. आध्यात्मिक वृत्तीचे दत्तभक्त होते. १९३६ साली रेल्वेतून सेवानिवृत्त झाल्यावर गंजबसोदा भोपाळमध्येच जमीन घेऊन शेती केली. परंतु १९५६ साली कुळ कायद्याने जमीन गेली. मृत्यू इ. स. १९७६.
भार्या : १)माहेर वेणुताई दातार. राहणार महोबाजवळील बिजापूर (उ. प्रदेश) यांना १ पुत्र व ३ कन्या.
कन्या :
१) **बेबी**–सासर–मुळे.
२) **सुंदर**–सासर–पाटणकर.
३) **यमुनाबाई**–सासर–देवधर.
भार्या : २) **इंदिराबाई**–माहेर–गंगुबाई रामचंद्र लागू. मृत्यू १९४१ यांना ५ पुत्र व १ कन्या.
कन्या :
**सुलभा**–जन्म १९३५. पति–गोविंदराव भागवत, विदिशा.

३१/५ **बाळकृष्ण दत्तात्रय**–प्रथम भार्येचा पुत्र सन १९५८ साली अपघाताने मृत्यू. अविवाहित होते.
द्वितीय भार्येचा पुत्र–



**श्री. अनंत दत्तात्रय**

३२/५ **अनंत दत्तात्रय–जन्म** ११जून १९२७ सुखी सेवनिया, भोपाळ येथे. व्यवसाय–१९४६साली रेल्वेतून इंजिन ड्रायव्हर म्हणून निवृत्त. आध्यात्मिक प्रवृत्तीचे विचार व आवड, सार्वजनिक कार्यात सहभाग.
वास्तव्य–१८/१ आझाद गंज, सिपरी बझार, झांशी (उ. प्र).
भार्या : **सुमन**–जन्म ५ ।७ ।१९३३. माहेर–गंगूबाई वैजनाथ आपटे. इंदूर. मृत सन १९८६.
कन्या :
१) **रंजना**–जन्म १९५९. सासर–रंजना रघुनाथ करकरे. झांशी.
२) **वंदना**–जन्म १२ ।१ ।१९६१. सासर–वंदना जयंत कवी. पुणे.
३) **प्रार्थना**–जन्म ११ ।११ ।१९६६. सासर–प्रार्थना चंद्रकांत कुलकर्णी, विदिशा.
३३/६ **सुभाष अनंत**–जन्म ८ ।५ ।१९६४. झांशी. शिक्षण–एम्.एस्सी. इतर माहिती मिळाली नाही.
३४/५ **श्रीधर दत्तात्रय**–जन्म १९२९. झांशी येथे. मृत्यू १९६८.
भार्या : **इंदु**–माहेर–इंदु पांडुरंग कुंटे, नागांव, अलिबाग.
कन्या :

१) **कल्पना**–जन्म ११ ।७ ।१९६०. शिक्षण–बी.ए.
पति–अजय पुरोहित.
२) **चित्रा**–जन्म ८ ।१० ।१९६३. शिक्षण–बी.ए.
पति–संजय बुजोणे.
३५/६ **अनिल श्रीधर**–जन्म ९ ।७ ।१९६६.
फोटोग्राफीचा धंदा.
३६/६ **सुनिल श्रीधर**–जन्म २८ ।८ ।१९६०. पेपरचा धंदा.
३७/५ **मुकुंद दत्तात्रय**–जन्म १९३२. नोकरी–इरिगेशन डिपार्ट. वास्तव्य–विदिशा येथे स्वतःचे घर.
भार्या : **विमल**–माहेर–छत्रपूरचे केतकर.
व्यवसाय–शिक्षिका.
३८/६ **प्रकाश मुकुंद**–जन्म १७ ।१० ।१९६४.
शिक्षण–बी.ए. टी.व्ही.,रेडिओ डिप्लोमा.
कन्या :
१) **किरण**–जन्म २९ ।७ ।१९६२. शिक्षण–बी.ए.
२) **अरुणा**–जन्म ३० ।१० ।१९६६. शिक्षण–एम्.ए. करीत आहे. संगिताचा कोर्स.
३९/५ **केशव दत्तात्रय**–जन्म १९३८. शिक्षण–झांशी येथे. व्यवसाय–रेल्वे वर्कशॉप मध्ये नोकरी.
वास्तव्य–झांशी, (उ. प्र.).
भार्या : **सुंदर**–माहेर–सुंदर अण्णाजी खानवलकर.
कन्या :
१) **ममता**–जन्म २३ ।१ ।१९६९. शिकत आहे.
२) **सीमा**–जन्म २२ ।२ ।१९७४. मॅट्रिक.
४०/६ **नविन केशव**–जन्म १६ ।२ ।१९७७.
शिक्षण–ई. ६ वीत शिकत आहे.
४१/६ **गौरव केशव**–जन्म २९ ।४ ।१९८२.
शिक्षण–३ रीत शिकत आहे.
४२/५ **माधव दत्तात्रय**–जन्म १९४२ गंजवासोदा येथे.
शिक्षण–झांशी येथे. व्यवसाय–पी.डब्ल्यू.डी. मध्ये सब–इंजिनिअर. निवाली येथे नोकरी.
भार्या : **माधवी**–माहेर–मीरा ओक. दे-सागर यांचेकडे.
४३/६ **मंगेश माधव**–जन्म २४ ।११ ।१९७५.
शिक्षण–८वी त शिकत आहे.
४४/६ **मुकेश माधव**–जन्म १९ ।१० ।१९७७.
शिक्षण–६ वीत शिकत आहे.
४५/२ **चिंतामणी विष्णु(द.गे.)** –हे अभ्यंकर कुळातच दत्तक गेले. त्यांचे पुत्र काशीनाथ व शंकरराव ग्वाल्हेर येथे होते.
४६/२ **बाळकृष्ण विष्णु**–यास दोन पुत्र. विष्णु आणि गंगाधर यापैकी गंगाधर संन्यासी.
४७/३ **विष्णु बाळकृष्ण**– #
४८/३ **गंगाधर बाळकृष्ण**– #

# अभ्यंकर–नगरकर घराणे

## घराणे क्रमांक १

### वंशावळी क्र.१ कान्होर शाखा

१/१ **नारोबाबजी**–हे वयाच्या १९व्या वर्षी त्यांचे चुलते महादेवशास्त्री अभ्यंकर (वय ३५) यांजकडे नशीब काढण्यासाठी म्हणून गावडे आंबेरे येथून पुण्यास आले. हे मोठे जिद्दीचे होते. जीवनात काहीतरी विशेष कामगिरी करावी अशी त्यांची जिद्द होती. यांनी पुणे येथील इतिहास प्रसिध्द शनिवारवाडा २२ जानेवारी १७३२ रोजी बांधून पुरा केला. यांनी थोरले बाजीराव व नानासाहेब पेशवे या दोन पेशव्यांच्या कारकिर्दीत अत्यंत निष्ठेने कामगिरी बजावली. पेशवाईतील सलग ६ पेशव्यांची कारकीर्द पहाणारा हा एकमेव सरदार वयाच्या ९७ व्या वर्षी इ.स. १८०५ मधे मरण पावला. नारोबाबजी पासून तीन पिढ्यांनंतर त्यांच्या तीन शाखा निरनिराळ्या ठिकाणी विखुरल्या गेल्या. त्यापैकी एक शाखा कान्होर पठार येथे स्थायिक झाली. दुसरी शाखा पुणे येथे वस्ती करून वाढत गेली. तिसरी शाखा नाशिक येथे जाऊन आपल्या उपजीविकेचे साधन शोधू लागली. त्यातील एकाने गोदावरी नदीच्या तीरावर एक वाडा बांधला. त्यातील एकाचे नाव रावजी नगरकर असे होते. हे रावजी वैदिक धर्मातील सर्व आचार पाळीत व त्याला वैदिकाची जोड होती. त्यांनी श्री क्षेत्र त्रिंबकेश्वर येथील प्रसिध्द वैद्य विश्वंभट पारखी यांचेपाशी वैद्यकीचे शिक्षण घेतले.

२/२ **महादजी नारायण**–हे अत्यंत करारी होते. त्यांनी २० वर्षे कारभार करून वडिलांच्या कीर्तीत भर घातली परंतु गृहकलहामुळे त्यांचे मन उद्विग्न झाले व ते घर सोडून निघून गेले. सुरेगाव ता. नेवासे येथे गंगेच्या काठी राहिले. त्यावेळी सवाई माधवराव पेशवे यांची कारकीर्द चालू होती. त्यांनी गंगेच्या काठी ११ वर्षे तपश्चर्या केली व सिद्धी प्राप्त करून घेतली. नंतर त्यांनी नर्मदा नदीची प्रदक्षिणा पूर्ण करून ते शेवटी उज्जैनीस आले.

३/३ **यशवंत महादजी**–यांचे व पेशव्यांचे पटले नाही. म्हणून त्यांनी कारभार सोडून दिला व ते पुण्यास राहू लागले. यांना तालमीचा शौक होता. म्हणून त्यांनी पुण्यास एक तालीम बांधली. तिला नगरकर तालीम म्हणतात. यांचा वंश पुणे येथे वाढत गेला. त्याची माहिती अन्यत्र पहावी. त्यांचा पुत्र नीळकंठराव याने परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्वस्व गेले.

४/४ **नीळकंठ यशवंत**–याने पुण्यात जागेचा शोध घेऊन चोळखण आळीत एक जागा एक रुपया भाड्याने घेतली व तेथे तंबाखूचे दुकान काढले. त्यांना तीन मुलगे होते. त्यापैकी एक गणपतराव व दुसरा गोपाळ ऊर्फ दाजीसाहेब. ते जुलै १८८३ मधे वारले.

५/५ **गणपत नीळकंठ**–याना ३ पुत्र होते, त्यांची नावे-बळवंत, दामोदर, हरि.

६/६ **बळवंत गणपत**– #

७/६ **दामोदर गणपत**– #

८/६ **हरि गणपत**– #


९/५ **गोपाळ (दाजी) नीळकंठ**–जन्म ७।९।१८२८. मृत्यू १३।२।१८९९. सन १८५२ मधे शिक्षकाची नोकरी पुणे येथे सुरु केली. इ. स. १८५४ मधे पी.डब्ल्यू.डी. खात्याने इंजिनियरिंग स्कूल प्रथमच सुरू केले. तिथे त्यांना ज्येष्ठ शिक्षक म्हणून बोलावून घेतले. व नियुक्ती केली. या शाळेला नंतर 'इंजिनियरिंग कॉलेज ऑफ पूणा' हे नाव पडले. तिथे ते प्रोफेसर म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी एकूण ३१ वर्षे सेवा केली. त्यांचा सार्वजनिक कामात फार मोठा सहभाग होता. डेव्हिड ससून इन्फर्म या संस्थेच्या संस्थापनेत त्यांचे नाव होते. ते फिमेल हायस्कूलच्या नियामक मंडळात दहा वर्षे सेक्रेटरी या पदावर होते. त्यांनी ग्रंथालयात अनेक वर्षे काम केले. पुणे म्युनिसिपालिटीचे दोन वर्षे चेअरमन होते. रस्ता रुंदीकरणाचे पहिले काम त्यांनीच सुरु केले. इ. स. १८६८ मधे युनिव्हर्सिटीचे फेलो म्हणून सरकारकडून त्यांची नेमणूक करण्यात आली. त्यांना इ. स. १८७७ मधे रावबहादूर हा किताब दिल्लीकडून बहाल करण्यात आला.

## घराणे क्रमांक १

## वंशावळी क्रमांक १


## अभ्यंकर नगरकर घराणे

## गावडे आंबेरे–कान्होर–पुणे



## घराणे क्रमांक १
## वंशावळी क्रमांक १
## अभ्यंकर नगरकर घराणे
## गावडे आंबेरे–कान्होर–पुणे

पि. क्र. व्य. क्र.



भार्या : **राधाबाई**–मृत्यू १८९०.
कन्या : **मैना**–जन्म १८५०. यांना रघुनाथ, वामन, रामचंद्र, लक्ष्मण आणि केशव असे ५ पुत्र होते.
१०/६ **रघुनाथ दाजी**–जन्म १३ जानेवारी १८५२. व्यवसाय–वकील. ते अतिशय नामवंत वकील आणि थोर समाजकार्यकर्ते होते. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी, त्यांची बदली मुंबईस झाली तेव्हा रघुनाथ दाजींना बोलावून त्यांचेकडे पंचवीस हजार रुपये दिले व हे धर्मार्थ द्यावयाचे आहेत व ते ज्या पुण्यातील संस्थांना मदतीची जरुरी आहे अशांची चौकशी करून तुम्हाला पसंत पडेल त्या संस्थांना या रकमेतील व्याज प्रतिवर्षी देत जा असे सांगितले. इतका त्यांचेवर विश्वास होता. त्याप्रमाणे रघुनाथ नगरकर यांनी वसंत व्याख्यानमाला वेदशास्त्रोत्तेजक मंडळ आणि नेटिव्ह जनरल लायब्ररी आणि वक्तृत्वोत्तेजक मंडळ यांना विभागून पैसे दिले. यांनी शनिवारवाड्यासारखा त्याचे मागील बाजूस एक वाडा बांधला. तो सन १८९० साली पूर्ण झाला. त्याला रघुनाथ निवास असे नाव दिले. त्यांचा पहिला विवाह १८७२ साली झाला. परंतु त्यांची पत्नी लवकरच निधन पावली. म्हणून त्यांनी १८७५ मधे वैशंपायन घराण्यातील मुलीशी दुसरा विवाह केला. अनेक लहानमोठ्या सामाजिक कार्यात ते हिरीरीने भाग घेत असत. पूणा म्युनिसिपालिटीचे २० वर्षे सभासद होते. डेक्कन लिबरल क्लब, सार्वजनिक सभा व काँग्रेसमधे ते आत्मीयतेने काम करत होते. त्यामुळे त्यांचे वाड्यावर लो. टिळक, न्या. महादेव गोविंद रानडे आणि नामदार गोपाळ कृष्ण गोखले ह्यांच्यासारख्या विभूतींचे सतत वास्तव्य असे. ह्यांना तीन पुत्र होते.
११/७ **विनायक रघुनाथ**–शिक्षण–एल्. एम्. एन्. एस्. जन्म १९१६. अधिक माहिती मिळाली नाही.
१२/७ **भास्कर रघुनाथ**–शिक्षण–मॅट्रिक इ. स. १९०० साली. भावे स्कूल मधे नोकरी. शिक्षक.
१३/७ **विष्णु रघुनाथ**–१९०५ मधे स्कूल फायनल प्रथम. पी. डब्ल्यू. डी त नोकरी व नंतर पुराण वस्तू संग्रह खात्यात नोकरी.
१४/७ **महादेव रघुनाथ**– #
१५/७ **हरि रघुनाथ**–व्यवसाय-शिक्षक. काही काळानंतर व्यापार सुरु केला. त्यात कौशल्य दाखवून २७ वर्षे दुसऱ्याच्या ताब्यात असलेला 'रघुनाथ निवास' हा वडिलांनी बांधलेला दगडी वाडा त्यांनी २४ जून १९६५ रोजी पुन्हा विकत घेतला. त्याचे नाव 'रघुनाथ निवास' देऊन त्याचा ट्रस्ट केला व तो सामाजिक कार्यासाठी वापरला जावा अशी चोख व्यवस्था केली. त्यांना अपत्य नव्हते. दिवंगत पूर्वजांबद्दल आदर, स्वजनांबद्दल प्रेम, कौटुंबिक अभिमान, स्वकर्तव्याची जाणीव, दुर्वर्तनाबद्दल घृणा व तिरस्कार आणि अंतःकरणाचा मोठेपणा इ. सद्गुणाचे आपण अनुकरण केले पाहिजे व तसे करण्यातच आपले कल्याण व हित आहे अशी त्यांची विचारसरणी होती.
१६/६ **वामन गोपाळ**– #
१७/७ **नीळकंठ वामन**– #
१८/७ **सदाशिव वामन**– #
१९/७ **शंकर वामन**– #
२०/७ **पांडुरंग वामन**– #
२१/७ **मोरेश्वर वामन**– #
२२/६ **रामचंद्र गोपाळ**– #
२३/७ **दत्तात्रय रामचंद्र**– #
२४/६ **लक्ष्मण गोपाळ**– #

# अभ्यंकर–नगरकर घराणे

## घराणे क्रमांक १

## वंशावळी क्रमांक १

## पुणे शाखा

२५/७ **पुरुषोत्तम लक्ष्मण**–
भार्या : **सत्यभामा**–माहेर–रानडे, पुणे.
कन्या :
१) **इंदु**–सासर–चक्रदेव. माटुंगा, मुंबई.
२) **सिंधू**–सासर–फडके. बोरीवली, मुंबई.
३) **नीला**–सासर–गोडे, बनारस.

४) **सुलोचना**–सासर–रानडे, पुणे.
५) **मालती**–सासर–घुले, पिलानी.
२६/८ **गजानन पुरुषोत्तम**–जन्म २० ।६ ।१९१६. मृत्यू २१ ।२ ।१९९० शिक्षण–बी. ई (सिव्हिल.) व्यवसाय–पूना इंजिनियरींग कॉलेजमध्ये प्रोफेसर. नंतर डायरेक्टर ऑफ हायर एज्यूकेशन ह्या पदावरून १९७४ मध्ये निवृत्त. वास्तव्य–४९२ ब, नारायण पेठ, पुणे ३०.
भार्या : **कमल**–माहेर–कमल पुरुषोत्तम गोखले, पुणे.
कन्या :
१) **मंदाकिनी**–सासर–मंदाकिनी सुरेंद्र केळकर, पुणे.
२) **नलिनी**–सासर–नलिनी नारायण थत्ते, मुंबई.
३) **सरोजिनी**–सासर–सरोजिनी संतोष जोशी, बडोदे.
४) **लतिका**–सासर–लतिका भालचंद्र भट, पुणे.
२७/९ **पद्मनाभ गजानन**–जन्म १९५५. शिक्षण–बी. ई. (मेटॅलर्जी) व्यवसाय–मुंबई येथे खाजगी नोकरी.
भार्या : **नीलिमा**–माहेर–कुलकर्णी, पुणे.
२८/१० **रोहन पद्मनाभ**–जन्म १९८०.
२९/१० **पार्थ पद्मनाभ**–जन्म १९८८.
३०/९ **अरविंद गजानन**–जन्म २९ ।९ ।१९५६. शिक्षण–बी. एस्. सी. (फिजिक्स) व्यवसाय–स्वतःची बिल्डींग मटेरियल टेस्टिंगची लॅबोरेटरी पुणे येथे आहे. वास्तव्य–४९२ ब, नारायण पेठ, पुणे–३०.
भार्या : **स्नेहल**–शिक्षण–बी. एस्सी. व डी. लॅब. माहेर–स्नेहल केशव सात्तूरकर, औरंगाबाद. व्यवसाय–दी सेंट्रल वॉटर ॲंड पॉवर रिसर्च सेंटर, पुणे येथे ग्रंथपाल.
३१/१० **प्रथमेश अरविंद**–जन्म ६ ।२ ।१९९०.
३२/८ **नरहरि पुरुषोत्तम**–शिक्षण–बी. ई. (सिव्हिल) व्यवसाय–मध्ये रेल्वेत नोकरी. वास्तव्य–बी/१७, स्वरूप नगरी, कोथरूड, पुणे–२९.
कन्या :
१) **शुभांगिनी**–सासर–शुभांगिनी गाडगीळ, मुंबई.
२) **क्षमा**–सासर–क्षमा जोशी. पति–मिलिटरीमध्ये
३३/९ **भालचंद्र नरहरि**– #
३४/१० **संजय भालचंद्र**– #
३५/८ **दामोदर पुरुषोत्तम**–शिक्षण–बी. ई. (सिव्हिल). व्यवसाय–कॉन्ट्रॅक्टर. वास्तव्य–७५९/४५ डेक्कन जिमखाना, पुणे–४.
कन्या : **आरती**–सासर–आरती पटवर्धन, पुणे.
३६/९ **अच्युत दामोदर**– #
३७/१० **चिन्मय अच्युत**– #
३८/१० **पुरुषोत्तम अच्युत**– #
३९/९ **जनार्दन दामोदर**– #
४०/१० **रोहित जनार्दन**– #
४१/८ **काशीनाथ पुरुषोत्तम**–जन्म २२ ।२ ।१९२६. शिक्षण–बी. कॉम्. व्यवसाय–डेप्युटी कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स, कोल्हापूर ह्या हुद्दयावरून १९८४ मध्ये निवृत्त. वास्तव्य–४९२ अ, नारायण पेठ, पुणे–३०.
भार्या : **मृदुला**–माहेर-लीला नरहरि धारप, महाड जि. रायगड.
४२/९ **दिपक काशीनाथ**–जन्म २४ ।९ ।१९५४ शिक्षण–मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा. व्यवसाय–एस्.के.एफ्. मध्ये बंगलोर येथे नोकरी. वास्तव्य–बंगलोर.
भार्या : **शलाका**–माहेर–नीलिमा वसंत साठे, पुणे.
कन्या : **प्रणौती**–जन्म १९८२ शिकत आहे.
पुत्र–**श्रृगाल**–जन्म १९८६ शिकत आहे.
४३/९ **नीळकंठ काशीनाथ**–जन्म ३० ।१२ ।१९५८. शिक्षण–बी. कॉम., एल्. एल्. बी., सी. ए. व्यवसाय–मुंबई येथे शेअर-ब्रोकरचा व्यवसाय. वास्तव्य–३१० कॅडेल रोड, दादर, मुंबई–२८.
भार्या : **ममिता**–माहेर–ममिता मोडक. अपत्य नाही.
४४/८ **शिवराम पुरुषोत्तम**–शिक्षण–बी. ई. (सिव्हिल). व्यवसाय–मुंबई पोर्ट ट्रस्ट मध्ये नोकरी. वास्तव्य–दादर, हल्ली कोलंबो येथे.
कन्या :
१) **माधुरी**–सासर–परांजपे, सांगली.
२) **मेधा**–सासर–भिडे, मुंबई.
४५/७ **विश्वनाथ लक्ष्मण**– #
४६/७ **त्र्यंबक लक्ष्मण**– #
४७/७ **चिंतामणी लक्ष्मण**– #
४८/६ **केशव गोपाळ**– #
४९/४ **नारायण यशवंत**– #
५०/५ **त्रिंबक नारायण**– #
५१/६ **केशव त्रिंबक**– #

५२/६ **विनायक त्रिंबक–** #
५३/७ **गोविंद (बळवंत) विनायक–**हे सरकारी कागद पत्रांवर सही करताना गोविंद विनायक अभ्यंकर कंसात नगरकर अशी सही करीत असत. यांना ३ पुत्र आणि २ कन्या होत्या.
५४/८ **वामन गोविंद–**जन्म १८९६. मृत्यू १९५०. व्यवसाय–पुणे येथे पी. डब्ल्यू. डी. मध्ये नोकरी. ५ पुत्र व ३ कन्या.
५५/९ **नारायण वामन–**जन्म १९२५. शिक्षण–मॅट्रिक व्यवसाय–यांनी १९४६ ते १९४७ पर्यंत सैन्यात नोकरी केली. नंतर मध्य रेल्वेत, १९८३ पर्यंत, सेवानिवृत्त होईपर्यंत, सिनिअर स्टोअर्स ऑफिसर म्हणून नोकरी. वास्तव्य–देवबाप्पा सोसायटी, खारकर आळी, ठाणे.
भार्या : १) **अनुसूया–**माहेर–अथणीचे श्री. शंकर हणमंत जोग यांची द्वितीय कन्या अनुसूया. मृत्यू १९६३. यांना १ पुत्र–**जयंत–** २) **सुमन**–माहेर–गणेश दीक्षित यांची कन्या सुमन, यांचे पासून १ पुत्र–**राजेंद्र–** १ कन्या.
कन्या :**राजश्री–**जन्म १९६४. शिक्षण–बी. कॉम्. सासर–राजश्री संजीव थत्ते.
५६/१० **जयंत नारायण–**जन्म १९५०. शिक्षण–बी. एस्सी. व्यवसाय–परदेशी जहाजावर रेडीओ ऑफिसर वास्तव्य–ठाणे.
भार्या : **सुमती–**माहेर–सुमती द. जोशी. कर्जत.
५७/११ **हृषिकेश जयंत–**जन्म १९८७.
५८/१० **राजेंद्र नारायण–**जन्म १९६६. शिक्षण–एम्. एस्. सी. व्यवसाय-ग्लॅक्सो, ठाणे येथे नोकरी. वास्तव्य–ठाणे.
५९/९ **श्रीधर वामन–**जन्म १९३२. शिक्षण–बी. ए. भार्या : विलेपार्ले येथील जोग यांची कन्या.
६०/१० **मिलिंद श्रीधर–**जन्म १९५५. शिक्षण–बी. एस्. सी. वास्तव्य–माटुंगा.
भार्या :**सुनिता–**
६१/११ **मिहीर मिलिंद–**जन्म १९८७.
६२/९ **केशव वामन–**जन्म १९३६. शिक्षण–मॅट्रिक व्यवसाय–सध्या किर्लोस्कर ऑईल मध्ये सुपरवायझर.
कन्या :
१) **शुभदा–**शिक्षण–कॉमर्स १३ वी. सासर–भोसेकर, पुणे.
२) **संगीता–**शिक्षण–बी. एस्सी
६३/१० **संजय केशव–**शिक्षण–एन्. सी. टी. वी. टी डिप्लोमा. व्यवसाय–सध्या पुण्यातच कारखान्यामध्ये नोकरी.
६४/९ **भालचंद्र वामन–**जन्म १९३९. शिक्षण–मॅट्रिक व्यवसाय–पुणे कॉर्पोरेशन मध्ये लॅबोरेटरी असिस्टंट.
भार्या : माहेर–हुल्याळकर, पुणे.
कन्या :**वागेश्री–**शिक्षण–बी. कॉम्. करीत आहे.
६५/१० **मंदार भालचंद्र–**शिक्षण–१२ वीत शिकत आहे.
६६/९ **रघुनाथ वामन–**जन्म १९४०. शिक्षण–मॅट्रिक. वास्तव्य–सध्या डोंबिवलीत.
भार्या : राजगुरु नगर येथील श्री. जोशी यांची कन्या.
कन्या :**विदुला–**
६७/१० **विश्वास (विवेक) रघुनाथ–** #
६८/११ **विनीत विश्वास–** #
६९/८ **नीलकंठ गोविंद–**जन्म १९००.
शिक्षण–प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत स्वकष्टावर शिकून एल्. सी. पी. एस्; एल्. डी. एस्सी. डॉक्टर झाले. व्यवसाय–सैन्यात डॉक्टर म्हणून नोकरी. निरनिराळ्या ठिकाणी नोकरी निमित्त राहिले. तसेच १९४२ चे अगोदर व १९४७ चे नंतर काही दिवस अंदमान बेटावर सैनिक डॉक्टर म्हणून काम केले. कॅप्टनचे हुद्यावर असताना १९५२ साली सेवानिवृत्त. १९३९ चे अगोदर सैन्यात डॉक्टर्सना सुद्धा किंग्ज कमिशन अत्यंत थोड्यांना मिळत असे.
भार्या : **काशीताई–**माहेर–श्री. कृष्णाजी पंत जोग यांची कन्या. श्री. कृष्णाजी पंत हे सांगलीचे मळेकर यांचे कारभारी होते.
कन्या :
१) **कमल–**शिक्षण–बी.ए. पति–इंदूर येथील पॉलिटेक्निक मधील प्रोफेसर श्री. चिंतामणराव फाटक.
२) **पुष्पलता–**शिक्षण–बी.एस्सी. पति–अहमदाबाद येथील महाराष्ट्रीय आर्किटेक्ट श्री. अरविंद जोशी. यांचा अहमदाबाद येथे लोखंडी फर्निचरचा 'सुरेख फर्निचर्स' नावाचा मोठा कारखाना आहे.


## घराणे क्रमांक १

## वंशावळी क्रमांक २

## अभ्यंकर नगरकर घराणे

## गावडे आंबेरे–कान्होर-पुणे

पि. क्र. व्य. क्र.




७०/९ **पुरुषोत्तम (दामू) नीळकंठ** –शिक्षण–इलेक्ट्रिकल इंजीनिअर. व्यवसाय–एम्. एस्. ई. बी. चे पोफळी येथील कोयना विद्युत् केंद्रात अधिकारी.
कन्या : **गिरिजा**–शिक्षण–बी. एस्सी.
७१/१० **विद्याधर पुरुषोत्तम**–शिक्षण–इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर.
७२/१० **अशुतोष पुरुषोत्तम**–शिकत आहे.
७३/९ **विनायक नीळकंठ**–शिक्षण–डॉक्टर (पशुवैद्यक) व्यवसाय–सध्या पुण्यात सरकारी पशुवैद्यक विभागात सहाय्यक डायरेक्टर.
७४/१० **सुबोध विनायक**–विद्यार्थी.
७५/१० **रविंद्र विनायक**–विद्यार्थी.
७६/१० **प्रशांत विनायक**–विद्यार्थी.
७७/८ **शंभो (महादेव) गोविंद**–मृत्यू १९४९.
७८/५ **चिंतामण नारायण**– *
७९/६ **गंगाधर चिंतामण**– *
८०/६ **रामचंद्र चिंतामण**– *

## घराणे क्रमांक १

## अभ्यंकर नगरकर घराणे

## वंशावळी क्र. २

## गावडे आंबेरे–कोन्होर–पुणे

८१/३ **रामचंद्र महादेव**–हे शांत व कर्तव्यदक्ष होते. त्यांनी उत्तमप्रकारे कारभार करून चांगला वचक

बसविला. पेशवाईच्या अखेरपर्यंत म्हणजे इ.स. १८१८ पर्यंत कारभार केला. परक्यांच्या राज्यामुळे त्या घराण्याचे नगरच्या किल्ल्यातील ३ पिढ्यांचे वास्तव्य संपुष्टात आले. थोरले माधवराव पेशवे यांजकडून त्यांना कान्होर व परिसरातील १२ गावे, राहुरी, नेवासे आणि नगर या तालुक्यातील प्रत्येकी ४ गावे अशी एकूण २५ गावे जहागिरीत मिळाली. वृद्धापकाळी ते कान्होरास वास्तव्यास आले. म्हणून त्यांच्या वंशजांना कान्होरकर–नगरकर म्हणतात. व त्यांचे बंधु यशवंतरावांचे वंशज यांना पुणेकर–नगरकर म्हणतात.

८२/४ **लक्ष्मण (आबासाहेब) रामचंद्र** –हे धार्मिक वृत्तीचे होते. अनेक वेळा सहकुटुंब काशीयात्रा केल्या तेव्हा त्यांना एक पुत्र झाला. त्याचे नाव रामचंद्र. पुत्र संतान झाल्यावर आपल्या पणजोबांची दृष्टांत मूर्ती, श्री लक्ष्मीव्यंकटेश यांच्या दररोजच्या अभिषेकाची व नैवेद्याची जबाबदारी स्वतःकडे घेतली.

८३/५ **रामचंद्रराव लक्ष्मण**–यांना बुद्धिबळ, गंजिफा, सोंगट्या खेळण्याचा फार नाद होता.

८४/६ **शंकरराव रामचंद्र**–हे अल्पायुषी ठरले. लग्नानंतर वर्षाचे आतच त्यांचा अंत झाला.
भार्या : **पार्वती**–तथा मावशी. त्यांना पुत्र नव्हता म्हणून त्यांनी आपल्या चुलत दीराचा मुलगा त्रिंबक चिंतामण तथा दाजीसाहेब नगरकर यांना १९३८ मध्ये दत्तक घेतले. व त्याचे नाव 'लक्ष्मण' ठेवले.

८५/७ **लक्ष्मण शंकरराव (द.आ.)** –याना दाजीसाहेब म्हणत. शिक्षण–बी. एस्. सी. व्यवसाय–मुंबई येथे हायस्कूममध्ये नोकरी. फावल्या वेळात विद्यार्थ्यांना सायन्स व गणित हे विषय मोफत शिकवित. ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते होते. त्यांना अनेकदा कारावास भोगावा लागला. ते २ वर्षे भूमिगत होते. परदेशाचा त्यांनी भरपूर प्रवास केला होता. स्वावलंबी, निगर्वी व निर्व्यसनी तसेच उत्तम वक्ते होते. वयाच्या ७३ व्या वर्षी निधन पावले. कान्होरच्या हायस्कूमध्ये इ. १० वीच्या प्रथम विद्यार्थ्यास दाजीसाहेब नगरकर शिष्यवृत्ती त्यांच्या मुलाने, रत्नाकरने चालू ठेवली आहे.

८६/८ **रत्नाकर (राजाभाऊ) लक्ष्मण** –हा नारोबाबजीचा ८ वा वंशज. त्याने वंशपरंपरागत श्री. लक्ष्मीव्यंकटेशाचे अभिषेक पूजेची प्रथा उत्तम रीतीने चालू ठेवली आहे.

८७/४ **शिवराव (भाऊसाहेब) रामचंद्र** –वडीलबंधू लक्ष्मणराव यांना तिर्थयात्रा व देवधर्माचा छंद असल्यामुळे सर्व जहागिरीची जबाबदारी यांचेवर होती. ती त्यांनी मोठ्या दक्षतेने पार पाडली. यांना घोड्यांचा फार शौक होता. ५० अंबलक जातीचे घोडे, एक हत्तीण व २ उंट त्यांच्यापाशी होते. यांना ३ पुत्र होते.

८८/५ **कृष्णराव शिवराव**–यांना तालमीचा शौक होता. दररोज १००० जोर व १००० बैठका मारीत असत.

८९/६ **सदाशिवराव कृष्ण**–मृत्यू २१।२।१९८६ यांनाही वडीलांसारखा तालमीचा शौक होता. पुत्ररत्नासाठी त्यांनी तीन विवाह केले. तिसऱ्या पत्नीपासून एक पुत्र झाला. परंतु त्याचे ६ महिन्यातच निधन झाले.

९०/७ **दिनकर (बाळासाहेब) सदाशिव** –व्यवसाय–कुळकायद्यामुळे शेती करू लागले.

९१/८ **भालचंद्र (भैयासाहेब) दिनकर** –व्यवसाय–शेती. कान्होर येथे, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन करीत आहेत. ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच होते.

९२/४ **नारायण शिवराव**–हे अतिशय करारी व कर्तव्यदक्ष होते. यांना जनावरांची चांगली पारख होती. त्यांना अश्वपरिक्षक म्हणून लोक ओळखत असत. हे देशभक्त होते. त्यांना 'लोकमान्य टिळक' यांच्याविषयी अतिशय आदर होता. टिळक पंचांग गावात प्रथम वाचण्यास त्यांनीच सुरुवात केली.

९३/५ **दाजीसाहेब नारायण**–त्यांच्या कारकिर्दीत १९२२ साली इंग्रजांनी त्यांची जहागिरी खालसा केली व वाड्यातील सर्व शस्त्रास्त्रे जप्त केली. या आघाताने त्यांना १९२३ साली मृत्यू आला.

९४/६ **चिंतामण (अप्पासाहेब) दाजीसाहेब**–प्रसन्न व्यक्तीमत्त्व होते. गाण्याची आवड होती.
भार्या : **रमाबाई**–माहेर–बऱ्हाणपुरच्या सरदार भुस्कुटेंच्या कन्या. कान्होर गावी १९३८ साली ग्रामपंचायतीची स्थापना झाली. तेव्हापासून १५ वर्षे १९५३ पर्यन्त ते सरपंच होते. यांना २ कन्या होत्या.

९५/७ **भास्कर चिंतामण**–याना बापूसाहेब म्हणत.

यांचा जन्म १ ।११ ।१९०३ मृत्यू २२ ।२ ।१९८७. शिक्षण—प्राथमिक शिक्षण कान्होर येथे. इंग्रजी शिक्षण पुणे येथे. डोळयांच्या आजारपणामुळे इंग्रजी ६ वीतून शिक्षण सोडावे लागले. त्यानंतर कान्होर येथे येऊन शेती करू लागले. आधुनिक तंत्राचा वापर करून आदर्श शेतकरी हे नाव कमविले. पाण्याचा पंप व पिठाची गिरणी प्रथम कान्होरास आणली. शिवाय होमिओपाथीचा व्यवसाय करीत. १९५३ ते १९६८ सतत १५ वर्षे कान्होर ग्रामपंचायतीचे ते सरपंच होते. १९३८ साली रा. स्व. संघाची शाखा सुरू केली. गांधीवधानंतर ३ महिने कारावास भोगला. याना काव्याची व वाचनाची आवड होती.

भार्या : **यमूताई ऊर्फ अक्कामावशी**—त्यांचे वयाच्या ५० व्या वर्षी निधन झाले. अपत्य नाही.

९६/७ **त्रिंबक (दाजीसाहेब) चिंतामण (द. गे.)** —हे शंकर रामचंद्र याना दत्तक गेले व त्यानंतर त्यांचे नाव लक्ष्मण असे ठेवले. इतर माहिती वर क्रमांक ८५/७ वर दिली आहे.

९७/४ **गणपतराव शिवराव**— #

९८/२ **विठ्ठल नारायण**— #